## रे.दि.मु.नं ४७/२००९ मधील नि.५९ खालील आदेश

**हिराबाई चव्हाण .... वादी**

**वि**

**राजाराम चव्हाण ..... प्रतिवादी**

१. सदरचा अर्ज वादी तर्फे दावा दुरुस्ती करणेकामी केलेला आहे.

२. वादीने कथन केले आहे की, वादीने सदरचा दावा प्रतिवादीचे विरुध्द दावा मिळकतीचे सरस–निरस मानाने वाटपाबाबत केलेला आहे. सदरचा दावा चालू असतान प्रतिवादी नं.२ पुष्पा बजरंग पाटणे हिने दावा मिळकती पैकी गट नं.७१८ पैकी ५ आणे ४ पै चे क्षेत्र ७४६६ आर हे प्रतिवादी नं.६ सुरेश शामराव भगतवणी यांना रजिस्टर दस्त नं.१८ नुसर दिनांक १/१/२०११ रोजी विक्री केलेली आहे. सदरचा दस्त हा दावा चालु असताना झालेला आहे. त्यास Lies Pendency चा बाध येत आहे. प्रतिवादी नं.६ सुरेश शामराव भगतवणी याचे नाव दावा मिळकती पैकी गट नं.८०९ चे ७/१२ चे रेकॉर्ड सदरी दाखल आहे. वादी व प्रतिवादी नं.२ यांचे मधील गट नं.७१८ चे बाबत असलेला वाद संपुष्टात आलेला आहे. त्यामुळे प्रतिवादी नं.२ हिचे नाव दाव्याचे सरनाम्यातून कमी करणे जरुरीचे आहे. तसेच, दाव मिळकती पैकी गट नं.७१८ देखील कमी करणे क्रमप्राप्त झालेले आहे व त्यामुळे खालीलप्रमाणे दाव्यात दुरुस्ती करणेस परवानगी मिळावी.

३. प्रतिवादी नं.२ पुष्पा बजरंग पाटणे हिचे नावाचे पुढे '' नाव कमी केले'' हा शब्द लिहीणेस व नावास कंस करणेस परवानगी असावी. तसेच, दावा मिळकत नं.२, गट नं.७१८ याचे क्षेत्र, आकार, हिस्सा कमी करणेत यावा व त्याचे पुढे ''गट नंबर कमी केला'' हा शब्द लिहिणेस व

| अ.नं | गट.नं | क्षेत्र | आकार | हिस्सा |
|---|---|---|---|---|
| २ | ७१८ | ०–९५ | १–१५ | १/३ |
| | | पो.ख १–२९ | | |
| | | ----- | | |
| | | २–२४ | | |

यास कंस करणेस परवानगी असावी.

४. याउलटत प्रतिवादी नं.५ व ८ तर्फे म्हणणे दिले आहे की, वादीचा दुरुस्तीचा अर्ज कायदेशीर नाही व या प्रतिवादींना मान्य व कबूल नाही. वादी अर्जात कथन करीत असलेली मिळकत गट नं. ७१८ ही वादीच्या कथनाप्रमणे वडिलार्जित आहे. वादीने ज्यावेळी वाटपाचा दावा केलेला आहे त्या परिस्थितीत सदर मिळकत दाव्यातून कमी करीता येणार नाही. याचे कारण सदर मिळकतीचे क्षेत्र कोणच्या हिश्याला ठेवले आहे त्याबाबत वादीने अर्जामध्ये काहीही नमुद केलेले नाही. प्रतिवादी नं.५

यांचा गट नं २७७ बाबत व्यवहार हा १९६८ सालचा आहे आणि सदर व्यवहार वादी नं.१ चे सासरे व वादी नं.२ ते ५ यांचे आजोब यांनी केलेला आहे. सबब, सदर व्यवहाराबाबतची मागणी मुदतबाहय आहे. तसेच, प्रतिवादी नं.८ बाबतचा व्यवहार हाही मुदत बाहय आहे. अशा परिस्थितीत गट नं.७१८ मधील झालेल्या व्यवहरास दाव चालू असतना मान्यता देता येणार नाही व ते दाव्यातून कमी करीत येणार नाही. सबब, अर्ज फेटाळण्यात यवा

**४.** सदर कामी अर्जाचे व लिखित जबाबाची पाहणी केली असता, प्रस्तुत वादी तर्फे प्रतिवादी नं.२ पुष्पा बजरंग पाटणे हिचे नावाचे पुढे '' नाव कमी केले'' हा शब्द लिहीणेस व नावास कंस करणेस तसेच, दावा मिळकत नं.२, गट नं.७१८ याचे क्षेत्र, आकार, हिस्सा कमी करणेत यावा व त्याचे पुढे ''गट नंबर कमी केला'' हा शब्द लिहिणेस दुरुस्ती करण्याचा अर्ज मंजूर केल्यास मुळ दाव्याच्या स्वरुपात बदल होणार नाही. सदरची दुरुस्तीमुळे वादीस गट नं.७१८ मधील हिस्सा मागणेचा नाही. सदरची दुरुस्ती ही तांत्रीक स्वरुपाची व कायदयावर विसंबून अशी आहे. त्यामुळे वादीच्या दाव्यामधील कथनांवर कुठलाही बदल होणार नाही. तसेच, प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. म्हणून वादीचा अर्ज खर्चासहीत मंजूर करणे न्यायोचित होणार आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश करीत आहे.

## आदेश

१. वादीचा (नि.५९) चा अर्ज र.रु ५००/- (पाचशे फक्त )खर्चासहीत मंजूर करण्यात येत आहे. खर्चाची रक्कम प्रतिवादी यांना देणेत यावी.

**खंडाळा** **(ए.पी.दिवाण)**
**दिनांकः ११/७/२०१७** **दिवाणी न्यायाधीश क.स्तर, खंडाळा**
**ता.खंडाळा, जि.सातारा**